सत्र खटला क्र. १२/२०२२
सरकार -वि- मोहम्मद शकिल
<u>निशाणी क्रमांक-५३</u>

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ याची जबानी</u>**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव - किशोर डिगांबर सरनाईक,**
**वय - ४० वर्ष, व्यवसाय - नोकरी,**
**राहणार - कारंजा लाड**

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. व्ही. एम. बापट</u>**

०१. मी सध्या कारंजा लाड येथे वनपाल म्हणून कार्यरत आहे. दि. १४/१०/२०१७ रोजी मी वनपरिक्षेत्र कार्यालय मोताळा येथे वनपाल म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी मा–झ्याकडे रोहिनखेड वर्तुळ दिलेले होते. त्याअंतरर्गत मोताळा व मलकापूर परिसरातील प्रत्येकी ३० ते ४० गांवे होती. त्यादिवशी सकाळी ७.३० ते ८.०० वाजता मला वनरक्षक साहेबराव कुशोड याचा फोन आला. त्याने मला सांगितले की त्याने अवैध रेतीच्या वाहतुकीचा ट्रॅक्टर पकडलेला आहे. व पुढील कारवाही साठी तो मोताळाकडे ट्रॅक्टर घेवूनयेत असतांना गुळभेली गावाच्या समोर दत्तभवन घरासमोर ट्रॅक्टर चालक व मालाकाने त्याच्याशी हुज्जत घातली व त्याला मारहाण केली. त्यानंतर मी घटनास्थळावर गेलो. तेथे रेती खाली उतरवलेली होती व वनरक्षक साहेबराव कुशोड व वनमजुर बुडन खान हे तेथे हजर होते. वनरक्षकाला मार लागलेला होता व त्याच्या डाव्या डोळ्याखाली जखम झाली होती. त्यांनी मला घटना सांगितली. त्यानंतर आम्ही वनपरि–क्षेत्र कार्यालय येथे गेलो व घटनेची माहिति वरिष्ठांना दिली. त्यानंतर आम्ही पोलिस ठाणे धामणगांव बढे येथे फिर्याद दाखल करण्यासाठी गेलो. पोलिसांनी माझे बयान नोंदविले होते.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एस. डी. रावत</u>**

०२. घटना मला प्रत्यक्षात माहिती नाही. मला घटनेची ऐकीव माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गुळभेली गावाकडे गेलो नाही व मी सांगितल्याप्रमाणे कुठलिही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या डोळ्याला कुठलाही मारलागलेला पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व बुडन खान यांची त्यावेळी वनपरिक्षे–त्रामध्ये नियुक्ती झालेलीच नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच त्यांच्या नियुक्तीची कुठलिही कागदपत्रे आम्ही पोलिसांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2025.11.25 10:21:14 +0530

मलकापूर.

दिनांक - २४/११/२०२५

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

**CERTIFICATE**

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 24.11.2025 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 24.11.2025 |
| Date of uploading | : | 25.11.2025 |